## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/११/२०१७

### १) संगनमत करुन थापड बुक्यांनी मारहान करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक १०/११/२०१७ चे २१.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले घरी हजर असतांना यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ हा फिर्यादीचे घरी येवुन फिर्यादीस घराबाहेर ओढत नेवुन शिवीगाळ केली व आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीचे व त्याचे मुलीस थापड बुक्यांनी मारहान केली व फिर्यादीचे पत्नीस आरोपी क्र. २ ते ४ यांनी थापड बुक्यांनी मारहान केल्याने अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४४८,३५४(ब)३२३,५०४,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

### २) भांडण व शिवीगाळ करुन थापडबुक्यांनी मारहान केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक २६/१०/२०१७ चे १३.०० यातील फिर्यादी ग्यानीराम नारायणजी रोकडे वय ३८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड खापा याने लाईन मेनला विद्युत मिटर घेण्याकरीता पैसे दिले आहेत 'तुम्ही विद्युत मिटर केव्हा लावुन दयाल' असे म्हणाला असता तेव्हा आरोपीने फिर्यादीस तु बाळा लाईनमेन यास विद्युत मिटर बाबत का बोलला असे बोलुन भांडण, शिवीगाळ करुन थापडबुक्यांनी मारहान केले व काठीने डाव्या हाताचे मनगटावर मारल्याने फिर्यादीचे तोंडी व एक्स–रे रिपोर्ट व डॉ. परिक्षण अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२५,५०४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

### ३) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ बासाच्या काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक १०/११/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपली लहान बहीण हिला वडीलांचे घरी आणुन दिले असता यातील आरोपी भाऊ याने तुम्ही आमचे घरी का आले व माझ्या लहान बहीनीस आपल्या घरी कश्याला ठेवले असे बोलुन भांडण करुन फिर्यादीस बासाच्या काठीने डाव्या हाताच्या मनगटावर मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. एक्स–रे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२५,५०४,५०६(ब) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ. खोंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद .**

दिनांक ११/११/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपले पोलीस स्टॉपसह पेट्रोलींग करीत असता यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे वैद्यकीय परीक्षण केले असता पिएससी वरठी येथील डॉक्टरने दारु पिला असल्याचे अभिप्राय दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी राऊत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उपनि राऊत हे करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/११/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही सिहोरा येथील रॉयल पान मंदीर समोरील राज्य महामार्ग क्र. २७१ वर आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना. सार्वे पो.स्टे. सिहोरा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. सार्वे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**६) वैनगंगा नदीच्या पात्रात अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले ..:–**

दिनांक ११/११/२०१७ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील अनोळखी इसम वय अंदाजे ५५ ते ६० वर्ष, वयोगटातील याचे प्रेत वैनगंगा नदीच्या पात्रात उताण्या स्थितीत तरगतांना दिसल्याने फिर्यादी ताराचंद दिलदार सिंदीमेश्राम वय २९ वर्ष, रा. कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. बहादुरे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ११/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन सिहोरा, आंधळगाव, लाखांदुर व अडयाळ येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६५ लिटर हातभट्टी दारू किंमती ३,८००/–रूपया चा माल तसेच ३ लिटर ४२० मि.ली. देशी/विदेशी दारू किंमत ९८८/– रुपयाचा माल तसेच जुगारातुन किंमती २४५/–रु. असा एकुण ५०३३/– रुपया चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ११/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०३ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ९४ केसेस करण्यात आलेले आहे.

(एच.एम. रायपुरे)
स.पो.नि. (माहिती कक्ष)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.